महत्वाचे

ओबीसी, भटक्या विमुक्तांची १६ डिसेंबरला एल्गार सभा

नागपूर : ओबीसी भटके विमुक्त समाजाचे आरक्षण वाचविण्यासाठी, ओबीसींमधील मागच्या दाराने नियमबाह्य होणारी घुसखोरी रोखण्यासाठी, संपूर्ण महाराष्ट्रात ओबीसी समाजाची लोकचळवळ व आंदोलने सुरू झाली आहेत. त्याच अनुषंगाने वर्धा येथे १६ डिसेंबरला दुपारी ११ वाजता लोक महाविद्यालयाच्या मैदानावर सकल ओबीसी भटके विमुक्त आरक्षण बचाव एल्गार सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या सभेला ओबीसी नेते छगन भुजबळ यांच्यासह प्रकाश शेंडगे, महादेव जानकर, खा. रामदास तडस, आ. गोपीचंद पडळकर, ओबीसी मुस्लिम नेते शब्बीर अन्सारी, लक्ष्मण हाके, डॉ. बबनराव तायवाडे, लक्ष्मणराव गायकवाड यांच्यासह ओबीसी नेते मार्गदर्शन करणार आहेत.

विकासकामे भ्रष्टाचाराविरोधातील उपोषणाकडे सरकारचे दुर्लक्ष

मुंबई : परभणी येथील पालम नगरपंचायत विकास कामातील भ्रष्टाचाराची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते रामप्रसाद मणियार यांनी आझाद मैदानात उपोषण सुरूच ठेवले आहे.मणियार यांच्या सोबत सतीश सिरसकर , मधुकरराव राठोड व मारोती पोळ हेही उपोषणाला बसले आहेत. या प्रकरणाची मुख्यमंत्री कार्यालयाने कुठल्याही प्रकारची दखल घेतली नाही. एकीकडे भारतात प्रसिद्ध झालेल्या भ्रष्टाचाराच्या यादीत महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर असताना दुसरीकडे भ्रष्टाचारविरोधात लढा देणाऱ्या उपोषणकर्त्यांकडे लक्ष द्यायला मुख्यमंत्री कार्यालयाला वेळ नाही, असे उपोषणकर्ते मणियार यांनी सांगितले. नगरपंचायत पालम विकास कामातील भ्रष्टाचाराची चौकशी करणे व दोषींवर कठोर कारवाई करणे, नगरपंचायत पालम मुख्याधिकारी संतोषजी लोमटे यांना निलंबित करणे,पालम नगरपंचायतने केलेले घरांचे चुकीचे सर्वेक्षण व लावलेल्या भरमसाठ करांची पुनर्रचना करून कमी करणे,अशा मागण्या मणियार यांनी केल्या आहेत.

विविध मागण्यांसाठी उद्या बुटीबोरीपासून पायी मोर्चा

मुंबई : विविध प्रलंबीत मागण्यांसाठी आदिवासींतर्फे नागपूरचे औद्योगिक उपनगर असलेल्या बुटीबोरीपासून नागपूरपर्यंत असा पायी मोर्चा बुधवारी (दि.१३) काढण्यात येणार आहे.आदिवासी अधिकार राष्ट्रीय मंच व अखिल भारतीय किसान सभा यांच्यातर्फे हा मोर्चा होत असून माजी आमदार ,किसान मोर्चाचे आयोजक जीवा पांडू गावित व आ. विनोद निकोले नेतृत्व करणार आहेत. सकाळी ८ वा.बुट्टीबोरी उड्डानपुलपासून मोर्चाला सुरुवात होणार आहे, अशी माहिती आदिवासी अधिकारी राष्ट्रीय मंच व अ.भा.किसान सभेने दिली.हनुमाननगर, बुटीबोरी, गोसावीनगर येथील रहिवाश्यांना मालकी हक्कांचे पट्टे द्या, हनुमान नगर ते बुटीबोरीपर्यंत रस्ता व रेल्वे अंडरब्रिजचे काम तावडतोबीने सुरु करा, १२५०० आदिवासींच्या रिक्त पदांची भरती करा,आदिवासी वनाधिकार कायद्याची सक्तीने अंमलबजावणी करा, वनजमीन व इतर जमिनीवर अधिवास करणाऱ्यांना मालकी हक्काचे पट्टे द्या,अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपये प्रति हेक्टर नुकसान भरपाई द्या,कापसाला १२,५०० रुपये प्रति क्विंटल व सोयाबीनला ४५०० रुपये प्रतिक्विंटल हमी भाव द्या, विजेची नवीन स्मार्ट मीटर योजना रद्द करा,आदी मागण्या किसान सभेच्या आहेत.

विविध प्रलंबित मागण्यांसाठी वीज कामगार आझाद मैदानात एकवटले

मुंबई : करोडो रुपयांची वीजचोरी होत असताना सरकार गांभीयनि पावले उचलत नाही. वीज बिल वसुलीसाठी आम्हाला पुढे करते . आमची चतुर्थश्रेणी पदावर नेमणूक असताना प्रथम , द्वितीय , तृतीय श्रेणीतील अधिकारी व इतर स्टाफचे नेमके काम काय ? आम्हालाच कामाचे २४ तास का ? असे सवाल करत राज्यातील ९ वीज कामगार संघटना आझाद मैदानात एकवटल्या आहेत. सरकारने जर आमच्या मागण्या मान्य केल्या नाही तर राज्याला अंधारात ठेवायला भाग पाडू नका, असा इशारा वीज कामगारांनी सोमवारी आझाद मैदानातून सरकारला दिला आहे .वीज वसुली टप्पे करा , पेट्रोल भत्ता वाढ करावी , चतुर्थश्रेणी असणारा आमचा हुद्दा तृतीयश्रेणी करावा , कामाचे तास निश्चित करावेत , या प्रमुख मागण्या घेऊन राज्यभरातील हजारो चतुर्थश्रेणी वीज कामगार सोमवारी आझाद मैदानात आले आहेत . मोठ्या संख्येने आलेले हे कामगार पाहून पोलिसांनी मोठा बंदोबस्त ठेवला होता . रस्ता रोको व कायदा सुव्यवस्था बिघडू नये यासाठी आझाद मैदानाला पोलिसांनी कडे घातले होते.

पुणे लोकसभा मतदारसंघात पोटनिवडणूक घेणे शक्य नाही

केंद्रीय निवडणूक आयोगाची हायकोर्टात भूमिका

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

पुणे लोकसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक घेणे आता शक्य नाही, अशी भुमीका केंद्रीय निवडणूक आयोगाने आज उच्च न्यायालयात मांडली. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीची पूर्वतयारी तसेच निवडणूकसंबंधी इतर कामकाजामध्ये व्यस्त असल्यामुळे पुणे लोकसभा मतदारसंघात पोटनिवडणूक घेण्यास असमर्थता दर्शवत केंद्रीय निवडणूक आयोगाने बचावात्मक भुमीका घेतली. मात्र खंडपीठाने निवडणूक आयोगाचे हे स्पष्टीकरण असमर्थनीय असल्याचे मत व्यक्त करत केवळ नाराजी व्यक्त केली.

पुण्याचे खासदार गिरीश बापट यांच्या निधनानंतर पुणे लोकसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक पोटनिवडणूक न घेण्याची केंद्रीय निवडणूक आयोगाची कृती बेकायदेशीर व मनमानी असल्याचा दावा करून निवडूक तातडीने घेण्याचे आदेश द्या, अशी विनंती करणारी याचिका पुण्याच्या सुघोष जोशी यांनी यांनी हायकोर्टात दाखल केली आहे.

यावर न्या. गौतम पटेल व न्या. कमल खाता यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. मागील सुनावणी-वेळी खंडपीठाने केंद्रीय निवडणूक आयोगाला धारेवर धरत पोटनिवडणूक का घेतली नाही, असा सवाल उपस्थित करत भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देष दिले होते.

त्यानुसार केंद्रीय निवडणूक आयोगातर्फे अ‍ॅड. प्रदीप राजागोपाल यांनी २०२४ ची आगामी लोकसभा निवडणूक तसेच इतर निवडणुकांच्या कामात व्यस्त असल्याने मागील सहा महिन्यांत पुणे लोकसभा निवडणूक घेणे शक्य झाले नाही. तसेच आता पोटनिवडणूक घेतली तरी या पदाचा कार्यकाल वर्षभराने संपुष्टात येईल, असे सपष्ट केले.

आयोगाच्या या स्पष्टीकरणावर खंडपीठाने आश्चर्य व्यक्त केले. हिंसक घटनांमुळे तणावपूर्ण वातावरण असलेल्या मणिपूरमध्ये जर निवडणुका घेणे शक्य झाले नसते, तर ते समजू शकलो असतो, अशी टिप्पणी खंडपीठाने करत सुनावणी १३ डिसेंबरपर्यंत तहकूब ठेवली.

अन्य पोटनिवडणुका कशा काय घेतल्या ?

■ गिरीश बापट यांचे २९ मार्चला निधन झाल्याने त्यांची जागा रिक्त झाली. मात्र त्यानंतर इतर काही ठिकाणी पोटनिवडणुका घेण्यात आल्या. केंद्रीय निवडणूक आयोगावर जर इतर कामाचा ताण होता, तर मग अन्य ठिकाणी पोटनिवडणुका कशा काय घेतल्या, असा मुद्दा अ‍ॅड. मोर यांनी उपस्थित करत यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर जोरदार आक्षेप घेतला.याची दखल घेत खंडपीठाने याचिकाकर्त्यांना संबंधित तपशील सादर करण्याचे निर्देश दिले.

जिवाची बाजी लावून लढतोय; इंचभरही मागे हटणार नाही

तब्येत बिघडल्यानंतरही मनोज जरांगे-पाटलांचे भाषण

लोहारा : पुढारी वृत्तसेवा

माकणी - करजगाव (ता. लोहारा, जि. धाराशिव) येथे भाषणादरम्यान जरांगे पाटील यांची तब्येत बिघडली. त्यामुळे थोडक्यात भाषण उरकावे लागले. वैद्यकीय अधिकारी यांनी त्यांना विश्रांती घेण्याचा सल्ला दिला आहे. मात्र मी जीवाची बाजी लावून आरक्षणाची लढाई लढत आहे. इंचभरही मागे हटणार नाही. आपण सर्वांनी मला अशीच एकजुटीने साथ द्यावी, अशी हाक उपस्थितांना जरांगे पाटील यांनी दिली.

माकणी : मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी येथे झालेल्या सभेला संबोधित करताना जरांगे पाटील.

लोहारा तालुक्यातील सकल मराठा समाजाच्या वतीने मराठा आरक्षण मिळावे मागणीसाठी तालुक्यातील माकणी-करजगाव याठिकाणी सोमवारी (दि. ११) सभेचे आयोजन केले होते. या सभेला संबोधित करण्यासाठी जरांगे पाटील आले होते.

कार्यक्रमाला उपस्थित होण्यापूर्वीच त्यांची तब्येत बिघडली. त्यांना डॉक्टरांनी विश्रांती घेण्याचा सल्ला दिला. तरीही जरांगे यांनी सभेला उपस्थिती लावणार असल्याचा शब्द दिल्याचे आयोजकांनी सांगितले. दुपारी १२.२२ वाजता ते दाखल झाले. उन्हाची तीव्रता जाणवू लागली होती. भाषण चालू करताच जरांगे पाटील यांची तब्येत बिघडली. ते अचानक खाली बसले. त्यांनी बसूनच सभेला संबोधित केले.

यावेळी ते म्हणाले की, मराठा आरक्षणासाठी अनेकांनी आत्महत्या केल्या आहेत. यापुढे आत्महत्या होऊ द्यायच्या नाहीत. आरक्षण नसल्यामुळे मराठा तरुण शिक्षण, नोकरीपासून वंचित राहिले आहेत. मराठा लेकरांच्या वेदना सहन होत नाहीत. त्यांच्या व्यथा कोणी तरी मांडल्या पाहिजेत. पूर्वीच मराठा समाजाला आरक्षण मिळाले असते तर आज मराठा समाज प्रगत समाज म्हणून पुढे आला असता. समाज हाच माझा परिवार असून त्यांच्याशी कधीही गद्दारी करणार नाही. मराठा आरक्षणाची लढाई आपण ८० टक्के जिंकली आहे. आरक्षण मिळविल्याशिवाय मागे हटायचे नाही. ही हातात आलेली संधी घालवू नका. समाजाची एकजूट कायम ठेवा, असे आवाहनही त्यांनी केले.

मनोज जरांगे पाटील यांचे माकणी-करजगाव येथे आगमन होताच वाजत-गाजत मिरवणूक काढून ५१ जेसीबीतून फुलांचा वर्षाव करण्यात आला. ज्ञानेश्वर महाराज यांनी सत्कार केला. मराठा समाजाच्या वतीने सत्कार केला. तत्पूर्वी शाहीर जाधव यांनी आपल्या शाहिरीतून मराठा आरक्षणाबवत जागृती केली. दरम्यान, कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी उमरगा पोलिस उपविभागीय अधिकारी रमेश सरकते, लोहारा पोलिस निरीक्षक अजित चिंतले, सहायक पोलिस निरीक्षक सुरेश नरवडे यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. आयोजकांनी मोठ्या संख्येने स्वयंसेवक नेमले होते. या सभेला लहानांपासून वयोवृद्धांपर्यंत सर्वच वयोगटातील महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुस्लिम समाजाकडून सभेसाठी येणाऱ्या नागरिकांना पिण्याच्या पाण्याची मोफत सोय करण्यात आली होती. त्यामुळे आयोजकांनी मुस्लिम समाजाचे आभार मानले.

...तर मराठा नेत्यांना दारात उभे राहू देऊ नका

■ राजकारणी आपल्यात फूट पाडण्याचे षड्यंत्र आखतील; आपण ते यशस्वी होऊ द्यायचे नाही. २४ डिसेंबरपर्यंत मराठा नेते ठाम भूमिका घेऊन आपल्या पाठीशी राहिले पाहिजेत. त्यांनी तसे नाही केले तर त्यांना दारातही उभे राहू देऊ नका, असे आवाहन जरांगे यांनी केले.

शांततेत आंदोलन करा

■ सरकारने २४ डिसेंबर ही तारीख दिली आहे. तरीही गाफील राहू नका. गाव, घराघरातला मराठा जागा करा. २४ डिसेंबरला आरक्षण नाही मिळाले तर सरकारला घाम फोडल्याशिवाय राहणार नाही. परंतु आंदोलन शांततेत करावे, कुठेही तोडफोड, जाळपोळ करून नये, असे आवाहन त्यांनी केले.

मुंबईत १६ डिसेंबर रोजी आंतरराष्ट्रीय धम्मपरिषद

जागतिक धम्मगुरू दलाई लामा उपस्थित राहणार

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा संकल्प पूर्ण करण्यासाठी १६ डिसेंबर रोजी मुंबईत महालक्ष्मी रेसकोर्स मैदानात दुपारी ४ वा. आंतरराष्ट्रीय बौध्द धम्मपरिषद होणार आहे. विश्व शांतीचा संदेश देणा-या या बौध्द धम्म परिषदेस जागतिक बौध्द धम्मगुरु दलाई लामा उपस्थित राहणार आहेत. यावेळी लाखोंच्या संख्येने बौध्द आंबेडकरी जनतेने उपस्थित राहावे, असे आवाहन केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज केले.

वानखेडे स्टेडीयम येथील गरवारे क्लब येथे झालेल्या पत्रकार परिषदेत आठवले बोलत होते. यावेळी पुज्य भदंत राहुल बोधी महाथेरो, पद्मश्री कल्पना सरोज, अविनाश कांबळे, रिपाइंचे सरचिटणीस माजी राज्यमंत्री अविनाश महातेकर, राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे आदि उपस्थित होते.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी भारतात ऐतिहासीक धम्मचक्र प्रवर्तन केले. त्यांनी घेतलेल्या धम्मदिक्षेमुळे भारतात बौध्द धम्माचे पुनर्जीवन झाले.

जगात आज दहशतवाद, आतंकवाद, नक्षलवाद असा हिंसाचार वाढत आहे. अनेक ठिकाणी बॉम्बस्फोट आणि हिंसाचार होत आहे. शांतता भंग होत आहे. हमास आणि इस्त्रायलचे युध्द सुरु आहे. अनेक लोकांचे, बालकांचे त्यामध्ये जीव जात आहेत,असे आठवले यांनी सांगितले.

मध्य रेल्वे

ओएचई सुधारणा कार्य

ई-निविदा सूचना क्र. BB.EL.GSU. OHE.2023/3R5, dated : 11.12.2023

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (जीएसयू), ३ रा मजला, जुनी क्षेत्रीय व्यवस्थापक इमारत, गुड्स डेपो, पी डीमेलो रोड, वाडीबंदर, मुंबई-४०००१० हे भारताच्या राष्ट्रपतींकरिता व त्यांच्या वतीने खालील कामाकरिता सुस्थापित व नामांकित कंत्राटदारांकडून खुल्या ई-निविदा (एक पॅकेट प्रणालीतून) वेबसाईट **www.ireps.gov.in** च्या माध्यमातून मागवीत आहेत. हस्ते स्वरूपात सादर केलेल्या निविदा स्वीकारण्यात येणार नाहीत. निविदा सादरीकरणाची अंतिम तारीख व वेळ : १५.०१.२०२४ रोजी दु. ३.०० वाजेपर्यंत अशी असून निविदा त्याच दिवशी दु. ३.१५ वाजता उघडण्यात येतील. **कामाचे वर्णन** : मुंबई विभागात अमृत भारत स्थानक योजनेअंतर्गत १५ स्थानकांत रेल्वे प्लॅटफॉर्मवर सरकत्या जिन्यांच्या तरतुदीसंदर्भात विद्यमान २५ केव्ही एसी ओएचईमध्ये ओएचई सुधारणा कार्य. **निविदा मूल्य (अंदाजे)** : रु. २.३७ कोटी, **आवश्यक बोली सुरक्षा** : रु. २,६८,६००.००, **प्रस्ताव वैधता** : ६० दिवस, **कार्यपूर्तता कालावधी** : ६ महिने (पावसाळा समाविष्ट). निविदेचा संपूर्ण तपशील वेबसाइट **www.ireps.gov.in** वर उपलब्ध आहे. संपूर्ण निविदा दस्तावेज वेबसाइटवरून डाऊनलोड करता येऊ शकतील.

ADEE/GSU/BB
मध्य रेल्वे, वाडीबंदर

तिकीटासाठी UTS APP डाऊनलोड करा 749

जाहीर समन्स

न्यायाधीश, सहकार न्यायालय, क्रमांक १, कोल्हापूर यांचे न्यायालयांत

सी. सी. एस. क्रमांक :- ६३५/२००२

१. श्री. वसंतराव चौगुले नागरी सहकारी पतसंस्था लि. कोल्हापूर, मुख्य कार्यालय, ५३२, ई वॉर्ड, शाहूपुरी, कोल्हापूर. } **वादी**

विरुद्ध

१. श्वेता शशांक शेटे वगैरे. रा. ए.एफ-३, ब्ल्यू अपार्टमेंट, न्यू पॅलेस रोड, कोल्हापूर. } **प्रतिवादी**

प्रतिवादी नंबर ५. श्री. गंगाधर रघुनाथ शेटे, (मयत वारस),
५अ. श्री. शशांक गंगाधर शेटे,
रा. ६६ बी, गंगाबाई मेन्शन, भोईवाडा, परेल, मुंबई-४०००२२
५ब. श्वेता शशांक शेटे,
रा. ६६ बी, गंगाबाई मेन्शन, भोईवाडा, परेल, मुंबई-४०००२२

ज्याअर्थी या न्यायालयात वादीने वरील दावा दाखल केला असून वर नमूद केलेले प्रतिवादी या नात्याने, आपणांस वादीने दाव्यांत नमूद पत्त्यावर यापूर्वी शो-कॉज नोटीस पाठविल्या असता, आपणांस शो-कॉज नोटीस लागू झालेल्या नाहीत, तरी आपणांस, या समन्सद्वारे या न्यायालयांत जबाब देणे करिता, **दिनांक १५/०१/२०२४ इ. रोजी सकाळी ठीक ११.३० वाजता** हजर राहण्यास फर्माविण्यात येत आहे. सदर दिवशी हजर राहून आपण लेखी म्हणणे दाखल न केलेस आपले अपरोक्ष निकाल दिला जाईल.

आज दिनांक ११/१२/२०२३ इ. रोजी माझे सहीने व न्यायालयाचे मुद्रा यासह दिले.

मा. कोर्ट हुकूमावरून

ठिकाण :- कोल्हापूर
दिनांक :- ११/१२/२०२३

शिक्का

Sd/-
Judicial Clerk,
Co-Operative Court No. 1,
Kolhapur

न्यायालयांचा पत्ता :-
सहकार न्यायालय, क्रमांक १, कोल्हापूर यांचे कार्यालय,
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, कसबा बावडा, कोल्हापूर - ४१६ ००३

जाहीर समन्स

न्यायाधीश, सहकार न्यायालय, क्रमांक १, कोल्हापूर यांचे न्यायालयांत

सी. सी. एस. क्रमांक :- ६३६/२००२

१. श्री. वसंतराव चौगुले नागरी सहकारी पतसंस्था लि. कोल्हापूर, मुख्य कार्यालय, ५३२, ई वॉर्ड, शाहूपुरी, कोल्हापूर. } **वादी**

विरुद्ध

१. श्वेता शशांक शेटे वगैरे. रा. ए.एफ-३, ब्ल्यू अपार्टमेंट, न्यू पॅलेस रोड, कोल्हापूर. } **प्रतिवादी**

प्रतिवादी नंबर ५. श्री. गंगाधर रघुनाथ शेटे, (मयत वारस),
५अ. श्री. शशांक गंगाधर शेटे,
रा. ६६ बी, गंगाबाई मेन्शन, भोईवाडा, परेल, मुंबई-४०००२२
५ब. श्वेता शशांक शेटे,
रा. ६६ बी, गंगाबाई मेन्शन, भोईवाडा, परेल, मुंबई-४०००२२

ज्याअर्थी या न्यायालयात वादीने वरील दावा दाखल केला असून वर नमूद केलेले प्रतिवादी या नात्याने, आपणांस वादीने दाव्यांत नमूद पत्त्यावर यापूर्वी शो-कॉज नोटीस पाठविल्या असता, आपणांस शो-कॉज नोटीस लागू झालेल्या नाहीत, तरी आपणांस, या समन्सद्वारे या न्यायालयांत जबाब देणे करिता, **दिनांक १५/०१/२०२४ इ. रोजी सकाळी ठीक ११.३० वाजता** हजर राहण्यास फर्माविण्यात येत आहे. सदर दिवशी हजर राहून आपण लेखी म्हणणे दाखल न केलेस आपले अपरोक्ष निकाल दिला जाईल.

आज दिनांक ११/१२/२०२३ इ. रोजी माझे सहीने व न्यायालयाचे मुद्रा यासह दिले.

मा. कोर्ट हुकूमावरून

ठिकाण :- कोल्हापूर
दिनांक :- ११/१२/२०२३

शिक्का

Sd/-
Judicial Clerk,
Co-Operative Court No. 1,
Kolhapur

न्यायालयांचा पत्ता :-
सहकार न्यायालय, क्रमांक १, कोल्हापूर यांचे कार्यालय,
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, कसबा बावडा, कोल्हापूर - ४१६ ००३

मुंबई जिल्हा मध्यवर्ती को-ऑप बँक लि.

नोंदणीकृत कार्यालय : मुंबई बँक भवन, २०७, डॉ. डी.एन.रोड,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
कॉर्पोरेट लोन रिकव्हरी विभाग
दू. क्र. : ०२२-२२६१ ७१५४-५९.
ई-मेल : recovery@mumbaidistrictbank.com

ताबा सूचना

(सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, SARFAESI २००२ च्या नियम-८(१) अंतर्गत)

ज्याअर्थी, अधोहस्ताक्षरितांनी मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.चे प्राधिकृत अधिकारी म्हणून, सीक्युरिटायझेशन अँन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अँसेट्स अँन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट अँक्ट, २००२ अंतर्गत व सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ चे अनुच्छेद १३ (१२) सहवाचन नियम ९ अंतर्गत प्राप्त अधिकारान्वये **मे. साई इस्टेट कन्सल्टन्ट चेंबूर प्रा. लि., श्री. भगवान भेरूमल वाधवानी, श्रीमती सोनिया भगवान वाधवानी, श्री. अमित भगवान वाधवानी व श्री. विकी भगवान वाधवानी** - कर्जदार/ सहकर्जदार / गहाणवटदार यांना खालील सूचनेत नमूद केल्यानुसार रक्कम **रु. ७५३८.३३ लाख (रु. पंचाहत्तर कोटी अडतीस लाख तेवीस हजार मात्र)** अधिक मागणी सूचना दिनांकापासून प्रदान/ वसुलीच्या तारखेपर्यंत पुढील व्याज व अन्य प्रभार रकमेचे प्रदान संबंधित सूचनेच्या प्राप्तीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत करण्याचे निर्देश देणारी **मागणी सूचना दि. २९.१०.२०२२** जारी केली होती..

कर्जदार/सहकर्जदार/गहाणवटदारांनी सदर रक्कमेचा भरणा करण्यास कसूर केली असल्याने, सदर सूचना याद्वारे कर्जदार/सहकर्जदार/गहाणवटदार यांना व आम जनतेस देण्यात येत आहे की, अधोहस्ताक्षरितांनी सदर कायद्याचे अनुच्छेद १३चे उप अनुच्छेद (४) सहवाचन सीक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रूल्स, २००२ च्या नियम ८ अंतर्गत त्यांना प्राप्त अधिकारान्वये खालील निर्देशित मालमत्तेचा **दि. ०७.१२.२०२३** रोजी प्रत्यक्ष ताबा घेतला आहे.

विशेषत: कर्जदार/सहकर्जदार/गहाणवटदार यांना व आम जनतेस इशारा देण्यात येत आहे की, त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात व्यवहार करू नये व असे कोणतेही व्यवहार हे मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. यांच्या शाखेच्या प्रभारांतर्गत रक्कम **रु. ७५३८.२३ (रु. पंचाहत्तर कोटी अडतीस लाख तेवीस हजार मात्र)** अधिक त्यावरील व्याज रकमेच्या अधीन असतील.

कायद्याच्या अनुच्छेद १३ च्या उपअनुच्छेद (८) च्या तरतुदींअंतर्गत कर्जदार/सहकर्जदार/गहाणवटदार यांचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे की त्यांनी उपलब्ध वेळेमध्ये प्रतिभूत मालमत्ता सोडवून घ्यावी.

स्थावर मालमत्तेचे विवरण

फ्लॅट क्र. १०१, मोजमापित ६३.१७ चौ. मी. अर्थात ६८० चौ. फूट अंदाजे चटई क्षेत्रफळ व बिल्ट अप क्षेत्र ७५.८० चौ. मी. अर्थात ८१६ चौ. फूट अंदाजे बिल्ट अप क्षेत्र, पहिला मजला, कॅलिस्टा, प्लॉट क्र ५५ धारक मोजमापित ५४८.२० चौ. मी., सीटीएस क्र. २४३, २४३/१ ते २४३/४ धारक जमिनीच्या सर्व त्या भाग व भूखंडावर निर्मित, सिंधी कॉलनी, चेंबूर, मुंबई - ४०० ०७१, तालुका कुर्ला, नोंदणीकरण जिल्हा व उपजिल्हा वांद्रे शहर व मुंबई उपनगर येथील व सीमा पुढीलप्रमाणे :

उत्तरेस वा त्या दिशेस : सीटीएस क्र. २४६ धारक भूखंड
दक्षिणेस वा त्या दिशेस : सीटीएस क्र. २४२ धारक भूखंड
पूर्वेस वा त्या दिशेस : सीटीएस क्र. २४४ धारक भूखंड
पश्चिमेस वा त्या दिशेस : ४० फूट रस्ता.

दिनांक : १०.१२.२०२३
ठिकाण : मुंबई

श्री. समीर बी. म्हापूसकर
प्राधिकृत अधिकारी
मुंबई जिल्हा मध्यवर्ती को-ऑप बँक लि.

मुंबई जिल्हा मध्यवर्ती को-ऑप बँक लि.

नोंदणीकृत कार्यालय : मुंबई बँक भवन, २०७, डॉ. डी.एन.रोड,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
कॉर्पोरेट लोन रिकव्हरी विभाग
दू. क्र. : ०२२-२२६१ ७१५४-५९.
ई-मेल : recovery@mumbaidistrictbank.com

ताबा सूचना

(सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, SARFAESI २००२ च्या नियम-८(१) अंतर्गत)

ज्याअर्थी, अधोहस्ताक्षरितांनी मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.चे प्राधिकृत अधिकारी म्हणून, सीक्युरिटायझेशन अँन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल अँसेट्स अँन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट अँक्ट, २००२ अंतर्गत व सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ चे अनुच्छेद १३ (१२) सहवाचन नियम ९ अंतर्गत प्राप्त अधिकारान्वये **मे. साई इस्टेट कन्सल्टन्ट चेंबूर प्रा. लि., श्री. भगवान भेरूमल वाधवानी, श्रीमती सोनिया भगवान वाधवानी, श्री. अमित भगवान वाधवानी व श्री. विकी भगवान वाधवानी** - कर्जदार/ सहकर्जदार / गहाणवटदार यांना खालील सूचनेत नमूद केल्यानुसार रक्कम **रु. ७५३८.३३ लाख (रु. पंचाहत्तर कोटी अडतीस लाख तेवीस हजार मात्र)** अधिक मागणी सूचना दिनांकापासून प्रदान/ वसुलीच्या तारखेपर्यंत पुढील व्याज व अन्य प्रभार रकमेचे प्रदान संबंधित सूचनेच्या प्राप्तीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत करण्याचे निर्देश देणारी **मागणी सूचना दि. २९.१०.२०२२** जारी केली होती.

कर्जदार/सहकर्जदार/गहाणवटदारांनी सदर रक्कमेचा भरणा करण्यास कसूर केली असल्याने, सदर सूचना याद्वारे कर्जदार/सहकर्जदार/गहाणवटदार यांना व आम जनतेस देण्यात येत आहे की, अधोहस्ताक्षरितांनी सदर कायद्याचे अनुच्छेद १३चे उप अनुच्छेद (४) सहवाचन सीक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रूल्स, २००२ च्या नियम ८ अंतर्गत त्यांना प्राप्त अधिकारान्वये खालील निर्देशित मालमत्तेचा **दि. ०७.१२.२०२३** रोजी प्रत्यक्ष ताबा घेतला आहे.

विशेषत: कर्जदार/सहकर्जदार/गहाणवटदार यांना व आम जनतेस इशारा देण्यात येत आहे की, त्यांनी सदर ममालमत्तेसंदर्भात व्यवहार करू नये व असे कोणतेही व्यवहार हे मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. च्या प्रभारांतर्गत रक्कम **रु. ७५३८.२३ (रु. पंचाहत्तर कोटी अडतीस लाख तेवीस हजार मात्र)** अधिक त्यावरील व्याज रकमेच्या अधीन असतील.

कायद्याच्या अनुच्छेद १३ च्या उपअनुच्छेद (८) च्या तरतुदींअंतर्गत कर्जदार/सहकर्जदार/गहाणवटदार यांचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे की त्यांनी उपलब्ध वेळेमध्ये प्रतिभूत मालमत्ता सोडवून घ्यावी.

स्थावर मालमत्तेचे विवरण

१. फ्लॅट क्र. ७०२, मोजमापित ४५३.७० चौ.फूट, ७ वा मजला, आच्छादित कार पार्किंग जागा क्र. ५ समवेत, बेसमेंटमधील, ए विंग, **"राज एकज्योत सुकृती"**, प्लॉट क्र. ६११, चेंबूर येथील उपनगर योजना क्र. १, सीटीएस क्र. ४३१ व ४३१/४ ते १५, गाव चेंबूर, तालुका कुर्ला, मोजमापित ७८३ चौ. मी. जवळपास, व्ही.एन. पुरव मार्ग, चेंबूर, मुंबई - ४०० ०७१ येथील नोंदणीकरण उपजिल्हा कुर्ला, मुंबई उपनगर जिल्हा येथील व सीमा पुढीलप्रमाणे.

२. फ्लॅट क्र. ५०२, मोजमापित ६१०.५३ चौ.फूट, ५ वा मजला, १ आच्छादित कार पार्किंग जागा क्र. ७ समवेत, बेसमेंटमधील, बी विंग, **"राज एकज्योत सुकृती"**, प्लॉट क्र. ६११, चेंबूर येथील उपनगर योजना क्र. ३, सीटीएस क्र. ४३१ व ४३१/४ ते १५, गाव चेंबूर, तालुका कुर्ला, मोजमापित ७८३ चौ. मी. जवळपास, व्ही.एन. पुरव मार्ग, चेंबूर, मुंबई - ४०० ०७१ येथील नोंदणीकरण उपजिल्हा कुर्ला, मुंबई उपनगर जिल्हा येथील व सीमा पुढीलप्रमाणे.

३. फ्लॅट क्र. २०२, मोजमापित ६१०.५३ चौ.फूट, २ रा मजला, १ आच्छादित कार पार्किंग जागा क्र. १४ समवेत, बेसमेंटमधील, बी विंग, **"राज एकज्योत सुकृती"**, प्लॉट क्र. ६११, चेंबूर येथील उपनगर योजना क्र. ३, सीटीएस क्र. ४३१ व ४३१/४ ते १५, गाव चेंबूर, तालुका कुर्ला, मोजमापित ७८३ चौ. मी. जवळपास, व्ही.एन. पुरव मार्ग, चेंबूर, मुंबई - ४०० ०७१ येथील नोंदणीकरण उपजिल्हा कुर्ला, मुंबई उपनगर जिल्हा येथील व सीमा पुढीलप्रमाणे.

उत्तरेस वा त्या दिशेस : सीटीएस क्र. २३१ धारक भूखंड
दक्षिणेस वा त्या दिशेस : सीटीएस क्र. २७८ धारक भूखंड
पूर्वेस वा त्या दिशेस : सीटीएस क्र. २३२ धारक भूखंड
पश्चिमेस वा त्या दिशेस : सीटीएस क्र. २८४ धारक भूखंड

दिनांक : १०.१२.२०२३
ठिकाण : मुंबई

श्री. समीर बी. म्हापूसकर
प्राधिकृत अधिकारी
मुंबई जिल्हा मध्यवर्ती को-ऑप बँक लि.

एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड
(आधीची एल&टी फायनान्स लि, स्कीम ऑफ अमालगमेशन अंतर्गत एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लि. शी संलग्न होऊन ज्याची अंमलबजावणी 4 डिसेंबर 2023 रोजी झाली)
नोंदणीकृत कार्यालय: नोंदणीकृत कार्यालय: एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177 कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
CIN No.: L67120MH2008PLC181833
शाखा कार्यालय: कोल्हापूर

L&T Finance

तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव

एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेडचे अधिकृत अधिकारी वित्तीय मालमत्ता पुनर्रचना आणि अनामत व्याजाची सक्तवसुली कायदा, 2002 (2002 चा 54) अंतर्गत आणि सदर कायद्यांतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून आपली थकबाकी आणि पुढील व्याज, आकार आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **''सार्वजनिक ई-लिलावाद्वारे''** **''जिथे आहे जसे आहे तत्वावर''** आणि **''ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत तत्वावर''** खालील मालमत्तेचा ई-लिलाव करीत आहेत.

कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव	तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता	कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक)	ताबा घेतला	बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये)	एकूण शिल्लक थकबाकी 06.12.2023 नुसार	आरक्षित किंमत (रुपयांमध्ये)	आरंभाची तारीख	लिलावाची तारीख आणि वेळ
1. इंद्र आर पांडे 2. नेहा इंद्र आर पांडे	मालमत्तेचा पत्ता-फ्लॅट नं.1106 क्षेत्रफळ 58.08 चौरस मीटर्स रेरा चटई क्षेत्रफळ, 'वर्सटाइल वॅली' नावाच्या इमारतीच्या 'डी' विंगमध्ये 11 व्या मजल्यावर, जमीनीचा जुना सर्वे नं.11/9 आणि नवीन सर्वे नं.12/9, गाव-निळजे, तालुका कल्याण, जिल्हा ठाणे, निळजे ग्रामपंचायतीच्या मर्यादित, डोंबिवली (पू), कल्याण, महाराष्ट्र 421204	H04884230123055620, H04884230123055620G, H04884220223023657, H04884220223023657G	13 नोव्हेंबर 2023	रु. 5,81,560	रु.1,39,40,946.04	रु.58,15,600	09-01-2024	15-01-2024 सकाळी 11 वा
	मालमत्तेचा पत्ता-फ्लॅट नं.2002 क्षेत्रफळ 58.08 चौरस मीटर्स रेरा चटई क्षेत्रफळ, 'वर्सटाइल वॅली' नावाच्या इमारतीच्या 'सी' विंगमध्ये 20 व्या मजल्यावर, जमीनीचा जुना सर्वे नं.11/9 आणि नवीन सर्वे नं.12/9, गाव-निळजे, तालुका कल्याण, जिल्हा ठाणे, निळजे ग्रामपंचायतीच्या मर्यादित, डोंबिवली (पू), कल्याण, महाराष्ट्र 421204			रु. 5,81,560	रु.1,39,40,946.04	रु.58,15,600	09-01-2024	15-01-2024 दुपारी 1 वा

सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **13/01/2024** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुरावायचंच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10 टक्के परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTHF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **15/01/2024** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **16/01/2024** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुसार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेचे निरिक्षण किंवा आणखी माहितीसाठी, संभाव्य बोलीदारांनी अधिकृत अधिकाऱ्यांना संपर्क करावा म्हणजे मालमत्तेचे निरिक्षण किंवा आणखी माहिती, संभाव्य बोलीदारांनी अधिकृत अधिकाऱ्यांना म्हणजे **''नाव - हरिलाल गुप्ता, संपर्क क्रमांक 8080302861, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लि.- ऑफिस नं. 6वा मजला, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीस शोरुमजवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400098. आणि संतोष तिवारी, संपर्क क्रमांक 9920490126, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लि. - ऑफिस: 6वा मजला, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीस शोरुमजवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400098.''** या पत्त्यावर संपर्क साधावा. ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी बोली/प्रस्ताव स्विकारू/नाकारू/बदल/रद्द करु शकतात किंवा कोणतेही कारण न देता आणि पूर्वसूचना न देता ई-लिलावपुढे नेऊ शकतात.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8(6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/ गॅरेंटर (एक/अनेक)/ मॉर्टगेजर (एक/अनेक)/ सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

दिनांक: 12.12.2023
ठिकाण: डोंबिवली

स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी
करिता एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड